MHST050004622015

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | – | ०८/१०/२०१५ |
| नोंदणी तारीख | – | ०९/१०/२०१५ |
| निकाल तारीख | – | १८/०३/२०२६ |
| कालावधी | – | १०व.०५म. ०९दि. |

## दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कराड, यांचे न्यायालयात

( पिठासीन अधिकारी : सु. बा. तोडकर )

**वारस अर्ज क्र.१०३/२०१५** **निशाणी क्र. ७०**

१. श्रीमती ज्योती सोमनाथ गुरव
वय– ३८ वर्षे, धंदा– गृहिणी.
२. सिध्दांत सोमनाथ गुरव.
वय – १४ वर्षे, धंदा – शिक्षण.
३. सोहम सोमनाथ गुरव.
वय – १० वर्षे, धंदा – शिक्षण.
अ.क्र.२ व ३ चे वतीने अ.क्र.१
आई अज्ञान पालन कर्ती
सर्व रा. बनवडी, ता. कराड, जि. सातारा.

**...अर्जदार.**

**विरुद्ध**

१. श्रीमती मालन निवृत्ती गुरव.
वय – ५९ वर्षे, धंदा – नोकरी.
२. श्री. महादेव निवृत्ती गुरव.
वय– ४२ महिने, धंदा – नोकरी.
३. श्री. सचिन निवृत्ती गुरव.
वय – ३९ वर्षे, धंदा – नोकरी.
सर्व रा. बोबाळेवाडी, पो. शाळगांव,
ता. कडेगांव, जि. सांगली.

**.... सामनेवाली**

---

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट, १८२७ मधील कलम २ च्या तरतूदीप्रमाणे अर्ज.**

---

| | | |
|---|---|---|
| अर्जदारांतर्फे विधिज्ञ | – | श्री. व्ही. पी. मुळे. |
| सामनेवाला क्र.१ तर्फे विधीज्ञ | – | श्री. बी. जे. शिंदे. |
| सामनेवाला क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ | – | श्री. एन. बी. जाधव |

---

## न्यायनिर्णय

(घोषित दि.१८ मार्च, २०२६ )

अर्जदार यांनी सदरचा अर्ज बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट, १८२७ मधील कलम २ मधील तरतूदीप्रमाणे प्रमाणे वारस प्रमाणपत्र (हेयरशीप सर्टिफिकेट) मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे –

अर्जदार क्र.१ यांचे पती सोमनाथ निवृत्ती गुरव हे दि.०९/०३/२०१५ रोजी मयत झाले. त्यांनी त्यांचे हयातीत मृत्यूपत्र, व्यवस्थापत्र केलेले नाही. सबब त्यांचे नावावर असलेल्या स्थावर व जंगम मिळकतीस हिंदू वारस कायदा, १९५६ मधील तरतूदीनुसार वर्ग १ मधील असलेल्या उत्तराधिकारी / अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र मिळावे याकरीता त्यांनी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचा विवाह मयत सोमनाथ निवृत्ती गुरव यांचेबरोबर सन १९९९ मध्ये झाला. सोमनाथ हे हिमाचलप्रदेश, पुणे व नंतर कराड येथे खाजगी कारखान्यात नोकरी करीत होते. अर्जदार क्र.१ यांना सोमनाथ यांचेबरोबरचे विवाह संबंधातून सिध्दांत व सोहम ही मुले झालेली असून ती सध्या अर्जदार क्र.१ यांच्याबरोबर राहत आहेत. सिध्दांत व सोहम हे अज्ञान असल्याने अर्जदार क्र.१ या त्यांच्या पालन कर्त्या आहेत. अर्जदार क्र.१ यांचे सासरे निवृत्ती आत्माराम गुरव यांनी स्वकमाईतून श्री. लक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था बनवडी यांचेकडून भूखंड क्र.३१ हा खरेदी केला होता. त्यांनी संस्थेच्या नमुना आराखड्याप्रमाणे त्या भूखंडावर बांधकाम करण्यासाठी बँक ऑफ कराड शाखेचे अडीच लाख रूपयांचे कर्ज

मंजूर करून घेतले होते. परंतू, बांधकामाची व कर्जफेडीची त्यांची ऐपत नसल्याने व सोमनाथ हे कराड येथे स्थायिक होणार असल्याने तो भूखंड त्यांनी सोमनाथ यांचे नावावर वर्ग केला व बॅंकेच्या मंजूर कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी सोपवली. त्याप्रमाणे बॅंक दफ्तरी जरी निवृत्ती आत्माराम गुरव यांचे नावावर असले तरी मयत सोमनाथ निवृत्ती गुरव यांनी परतफेड केलेली आहे. निवृत्ती आत्माराम गुरव हे ६ ते ७ वर्षांपूर्वी मयत झालेले आहेत. त्यांची पत्नी म्हणजेच अर्जदार क्र.१ यांची सासू श्रीमती मालन निवृत्ती गुरव या हयात आहेत. त्या नोकरीनिमित्त परगावी राहतात. अधुनमधून येवून अर्जदार यांचे कुटुंबात वास्तव्य करतात. अर्जदार यांचे पती सोमनाथ निवृत्ती गुरव यांनी लक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये भूखंड क्र.३१ हा सन २००४ साली कब्जात घेतला. त्याप्रमाणे सोसायटीने सोमनाथ यांना सभासदत्व व १० भागप्रमाणपत्र सन २००५ मध्ये त्यांचे नावावर दिलेली आहेत. तसेच, सदर भूखंडावर मालक सदरी अर्जदार यांचे पती सोमनाथ निवृत्ती गुरव यांची मालकी सदरी ग्रामपंचायत अभिलेख सदराला नोंद व्हावी याकरीता पत्र दिलेले आहे. त्यानुसार सोमनाथ निवृत्ती गुरव यांची झालेली नोंद आजही ग्रामपंचायत अभिलेखाला नमूद आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती सोमनाथ निवृत्ती गुरव यांनी सदर भूखंडावर बॅंकेचे अडीच लाख रूपये कर्ज उचलले व स्वत: जवळील दिड लाख रूपये गुंतवून त्या ठिकाणी ४ लाख रूपये रकमेची इमारत बांधली असून ती अर्जदार व त्यांचे पती यांच्या ताब्यात होती. अर्जदार यांचे पतीच्या मृत्यूनंतर सदर इमारत ही अर्जदार यांचे एकट्यांचे ताब्यात आजही आहे. कर्जाचे हफ्ते मयत सोमनाथ निवृत्ती गुरव यांनी नोकरीत असताना भरलेले आहेत. त्यांचे दि.०९/०३/२०१५ रोजी निधन झाल्यानंतर सदर कर्जाची र.रू.१९,०००/- ची बाकी थकलेली आहे. अर्जदार क्र.१ या स्त्री असल्यामुळे व तिचे निधनानंतर त्यांना मिळकतीचा तपशील उपलब्ध झाला नव्हता. नुकतीच त्यांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी गृह निर्माण सोसायटीकडे वारस नोंदीसाठी अर्ज दिल्यानंतर त्यांनी अर्जदार यांना तोंडी सूचना देवून न्यायालयातून वारस दाखला आणण्याची सूचना दिली. म्हणून त्यांनी प्रस्तुतचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०३. अभिलेखावरून असे दिसून येते की, प्रथमत: अर्जदार यांनी मूळ अर्जामध्ये सामनेवाला म्हणून कोणासही सामील केले नव्हते. अर्ज दाखल झाल्यानंतर

न्यायालयाने संदर्भ व प्रकाशनाचा आदेश पारीत केला. त्यानंतर श्रीमती मालन निवृत्ती गुरव यांनी **नि.क्र.१३** ला ति–हाईत इसम म्हणून न्यायालयात हजर होवून मूळ अर्ज आहे तसा मंजूर करण्यास हरकती उपस्थित केलेल्या आहेत. श्रीती मालन निवृत्ती गुरव यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार यांनी मिळकत क्र.४४२ लक्ष्मी गृह निर्माण सोसायटीमधील भूखंड क्र.३१ पूर्व बाजूने क्षेत्रफळ १७७३.५२ चौ.फू. इ. करीता स्वत:साठी व मुलांकरीता अर्ज केलेला आहे. त्यामध्ये सामनेवाला म्हणून कोणासही समाविष्ट केलेले नाही. अर्जात नमूद मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. असे असताना अर्जदार यांनी वारस अर्जाने मिळकत मिळण्याकरीता अर्ज दाखल केल्याचे ति–हाईत इसम म्हणजे मालन यांना समजले आहे. वास्तविक पाहता अशा प्रकारचा वारस अर्ज स्थावर मिळकतीशी संबंधीत असल्यामुळे सर्व वारस यांना ते हिस्सेदार असल्याने त्यांना सामील करणे आवश्यक आहे. मालन या मयत सोमनाथ निवृत्ती गुरव यांच्या आई असून सोमनाथ यांना दोन भाऊ आहेत. प्रस्तुतचा अर्ज ति–हाईत इसम व सोमनाथ यांचे इतर दोन भाऊ यांचे अपरोक्ष एकतर्फा निर्णित झाल्यास त्यांचे हिताविरूध्द आदेश होवू शकतात. नमूद व्यक्ती या हितसंबंधी व्यक्ती आहेत. नमूद व्यक्ती या आवश्यक व गरजेच्या पक्षकार आहेत. त्यामुळे त्यांना पक्षकारपणात सामील करणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज संबंधीत न्यायालयाने दि.१५/०३/२०१६ रोजी मंजूर केला. त्यानंतर अर्जदार यांनी मूळ अर्जामध्ये ति–हाईत इसम श्रीमती मालन यांना समाविष्ट केले. त्यानंतर मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांच्याशी पत्रव्यवहार करून व त्यानंतर सदरचे प्रकरण दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे न्यायालयात प्रलंबित असताना हरकत उपस्थित झाल्यामुळे प्रकरण दिवाणी न्यायाधीश व.स्तर यांच्याकडे मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सातारा यांचे दि.०७/०८/२०१८ रोजीचे आदेशान्वये वर्ग करण्यात आले.

०४. प्रकरणाची कार्यवाही प्रलंबित असताना ति–हाईत इसम श्री. महादेव निवृत्ती गुरव व सचिन निवृत्ती गुरव यांनी दि.०२/०३/२०२१ रोजी न्यायालयात हजर होवून **नि.क्र.३८** वर हरकती नोंदवून मूळ अर्ज आहे तसा मंजूर करण्यास विरोध दर्शविला. तसेच, त्यांना स्वत:ला मूळ अर्जामध्ये सामील करून घ्यावे यासाठी विनंती केली. सदरचा अर्ज या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी

दि.२६/१०/२०२१ रोजी मंजूर करून त्यांना मूळ अर्जामध्ये सामील करून घेण्याचे आदेश अर्जदार यांना दिले होते. त्याप्रमाणे अर्जदार यांनी ति–हाईत इसम श्री. महादेव व श्री. सचिन यांना मूळ अर्जामध्ये सामनेवाला क्र.२ व ३ म्हणून सामील केलेले आहे. सामनेवाला क्र.२ व ३ यांची मूळ अर्जास खालीलप्रमाणे हरकत आहे. अर्जदार यांनी सदरचा अर्ज त्यांचे पती मयत सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे नावे ए.कु.अविभक्त हिंदू कुटुंबाचे संमतीने त्यांचे वडील मयत निवृत्ती आत्माराम गुरव यांनी लक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत बनवडी यांचेकडून भाडेपट्टा कराराने घेतलेला भूखंड क्र.३१ त्यावर केवळ कर्ज काढून बांधकाम करण्याची संमती दिल्याचे कारणावरून त्या मिळकतीचा वारसा फक्त सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे कायदेशीर वारस म्हणून कै. निवृत्ती यांची मुले सदरील ति–हाईत इसम म्हणजेच श्री. महादेव निवृत्ती गुरव व सचिन निवृत्ती गुरव व त्यांची आई मालन निवृत्ती गुरव हे देखील ठरत आहेत. परंतू, त्यांना पक्षकारपणात सामील न करता त्यांचे कायदेशीर हक्क बेकायदेशीरपणे डावलून व मिळकत गिळंकृत करून हडप करणेकरीता मूळ अर्ज दाखल केलेला असल्याने तो नामंजूर करावा अशी विनंती केलेली आहे. अर्जदार यांचे खेरीज श्रीमती मालन निवृत्ती गुरव, श्री. महादेव निवृत्ती गुरव श्री. सचिन निवृत्ती गुरव हे देखील उत्तराधिकारी आहेत. त्यांना देखील मूळ अर्जामध्ये ते आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना समाविष्ट करून घेणे आवश्यक व गरजेचे आहे असे म्हणणे नोंदविलेले आहे. सामनेवाला क्र.२ व ३ यांनी **नि.क्र.४८** वर खालील म्हणणे देवून मूळ अर्ज मंजूर करण्यास हरकती उपस्थित केलेल्या आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, कै.सोमनाथ निवृत्ती गुरव हे दि.०९/०३/२०१५ रोजी मयत झाले असून त्यांना अर्जदार क्र.१ पत्नी, अर्जदार क्र.२ मुलगा, अर्जदार क्र.३ मुलगी तसेच सामनेवाला क्र.१ आई आणि सामनेवाला क्र.२ व ३ हे भाऊ असे कायदेशीर वारस आहेत. त्यांचे वडील कै. निवृत्ती आत्माराम गुरव यांनी स्वकमाईतून श्री. लक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. बनवडी यांचेकडून भूखंड क्र.३१ खरेदी केलेला आहे. परंतू, अर्जदार यांनी कै. निवृत्ती यांना कायदेशीर वारस पत्नी – सामनेवाला क्र.१, कायदेशीर वारस मुले – सामनेवाला क्र.२ व ३ हे वारस असताना देखील त्यांना वगळून वारस दाखला मिळण्यासाठी खोटा व बनावट अर्ज दाखल केलेला आहे. त्यांनी न्यायालयात हरकती उपस्थित केल्यानंतर व त्यांना पक्षकारपणात सामील

करावे यासाठी अर्ज केल्यानंतर त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून सामील केल्यानंतर प्रस्तुतचे प्रकरण या न्यायालयाकडे वर्ग झालेले आहे. अर्जात नमूद असलेली मिळकत एकट्यानीच हडप करण्याच्या दृष्टीने अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. अर्ज मिळकत ही कै. निवृत्ती यांची स्वकष्टार्जित मिळकत असल्याने त्यांची पत्नी व तीन मुले यांनाही समान अधिकार आहेत. कै. सोमनाथ यांचा कै. निवृत्ती यांचे स्वकष्टार्जित मिळकतीमध्ये एकट्याचा हक्क व हितसंबंध नाही. कै. निवृत्ती यांनी भूखंड क्र.३१ मध्ये बांधकाम करणेसाठी बँक ऑफ इंडीया कराड शाखेचे अडीच लाख रूपयांचे कर्ज घेतलेले आहे. सदर भूखंडावर बांधकाम करणेसाठी तांत्रिक अडचण येवू नये म्हणून त्यांनी थोरला मुलगा म्हणून कै. सोमनाथ यांचे नावे गृहनिर्माण संस्थेचा भूखंड नोंद सर्वांचे संमतीने एकट्याचे नावे केलेले आहे. त्यामुळे गृहनिर्माण संस्थेचे भूखंडावर बांधकाम करण्यासाठी फक्त कै. सोमनाथ यांचे नाव वर्ग केले होते. सदर कर्जाची परतफेड कै. निवृत्ती व त्यांची तीन्ही मुले यांनी केलेली आहे. सदर भूखंडावर आई व तीन मुलांचा कब्जा आहे. कै. सोमनाथ यांच्या नावांच्या नोंदी नमुना क्र.८, भाग प्रमाणपत्र यांवर केवळ सदर भूखंडावर बांधकाम करणेसाठी सर्वांचे संमतीने नोंद केलेली आहे. त्याचा गैरफायदा घेण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्ज मिळकतीवर केवळ अर्जदार यांचे हक्क व हितसंबंध नसून अर्जदार यांचेदेखील आहेत. त्यामुळे उत्तरदायि म्हणून सामनेवाला क्र.२ व ३ यांना प्रमाणपत्र मिळणे आवश्यक व गरजेचे आहे.

०५. मूळ अर्जाची कार्यवाही प्रलंबित असताना सामनेवाली क्र.१ मालन निवृत्ती गुरव या दि.१५/१०/२०२३ रोजी मयत झाल्याने त्यांचे नावास कंस करून अर्जदार यांना मयताचे वारस म्हणून लिहिण्यास परवानगी मिळावी यासाठी त्यांनी **नि.क्र.५४** वर अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज दि.१३/१२/२०२३ रोजी मंजूर झालेला आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी आवश्यक त्या दुरूस्त्या नि.क्र.१ वर केलेल्या दिसून येतात.

०६. अर्ज, सामनेवाला यांचे म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांच्या आधारे या न्यायालयाचे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी नि.क्र.५६ वर खालील वादमुद्यांची निश्चिती केलेली आहे. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह मी खालील प्रमाणे नमुद करत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांनी केवळ ते कै. सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत असे शाबीत केले आहे काय ? | ... होकारार्थी. |
| २. | अर्जास असंयोजन तत्वाची बाधा येते असे सामनेवाला यांनी सिध्द केले आहे काय ? | ... टिकून राहिलेला नाही. |
| ३. | अर्जात मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास अर्जदार हे पात्र आहेत का ? | ... होकारार्थी. |
| ४. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

०७. अर्जदार यांनी अर्जातील कथनांच्या समर्थनार्थ अर्जदार क्र.१ श्रीमती ज्योती सोमनाथ गुरव यांनी स्वत:चे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१८ व ३३ वर दाखल केलेले आहे. अर्जदार यांचेतर्फे अ.सा.क्र.२ दिपक मारूती कोरडे या स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नि.क्र.६२ वर नोंदविण्यात आलेली आहे. अर्जदार यांनी अर्जदार क्र.१ व सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे विवाह नोंदणीचे मूळ प्रमाणपत्र नि.क्र.२१, सोहम– अर्जदार क्र.३ याचे जन्माचा दाखला नि.क्र.२२, मौजे बनवडी येथील लक्ष्मी सहकारी गृह निर्माण संस्थेमधील भूखंड क्र.३१ चे सूची क्र.२ चा उतारा नि.क्र.२३, सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे मृत्यूप्रमाणपत्र नि.क्र.२४, लक्ष्मी सहकारी गृह निर्माण संस्थचे भागप्रमाणपत्र नि.क्र.२५, मौजे बनवडी येथील ग्रामपंचायत मिळकत क्र.४६३ चा नमुना क्र.८ चा उतारा नि.क्र.२६ वर दाखल केलेला आहे. निवृत्ती आत्माराम गुरव व सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे संयुक्त गृह कर्ज खात्याचा खातेउतारा नि.क्र.६३ वर दाखल आहे. अर्जदार यांचे तर्फे जादा पुरावा देणे नाही अशी अंतिम पुरसिस नि.क्र.६४ वर दाखल केलेली आहे. याउलट, सामनेवाला यांच्यातर्फे सामनेवाला क्र.२ श्री. महादेव निवृत्ती गुरव यांचे सरतपसाचे प्रतिज्ञापत्र सा.सा.क्र.१ म्हणून नि.क्र.६७, साक्षीदार महादेव आप्पाजी गुरव यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सा.सा.क्र.२ म्हणून नि.क्र.६८ वर दाखल करण्यात आलेली

आहेत. सामनेवाला यांच्यातर्फे जादा तोंडी अथवा लेखी पुरावा देणे अशी पुरसिस नि.क्र.६९ वर दाखल करण्यात आलेली आहे.

<u>**मुद्दा क्र.२ करीता**</u> :–

०८. सदरचा मुद्दा मूळ अर्जास असंयोजन तत्वाची बाधा येते काय या संबंधीचा आहे. सदरच्या मुद्याच्या सिध्दतेचा बोजा सामनेवाला यांच्यावर टाकण्यात आलेला आहे. येथे हे प्रामुख्याने नमूद करणे आवश्यक व गरजेचे आहे की, मूळ अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयाने संदर्भ व प्रकाशनाचा आदेश पारीत केल्यानंतर ति–हाईत इसम म्हणून प्रथमत: मालन व त्यानंतर महादेव व सचिन यांनी न्यायालयात हजर होवून त्यांचे म्हणणे देवून अर्ज मंजूर करण्यास सक्तरित्या हरकती उपस्थित करून ते देखील वारस प्रमाणपत्र मिळण्याच्या अर्जामध्ये आवश्यक व गरजेचे पक्षकार आहेत अशा हरकती उपस्थित केलेल्या आहेत. त्यामुळे त्याबाबत काय कायदेशीर तरतूदी आहेत हे पाहणे आवश्यक व गरजेचे आहे.

०९. **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १ नियम ९** मध्ये काय तरतूदी आहेत हे देखील पाहणे आवश्यक व गरजेचे आहे. सदर तरतूदीमध्ये पक्षकारांचे अपसंयोजन किंवा असंयोजन या कारणामुळे कोणताही दावा विफल होता कामा नये आणि न्यायालयास प्रत्येक दाव्यामध्ये त्याच्या समोर प्रत्यक्ष असलेल्या पक्षकाराचे हक्क व हितसंबंध यांचा संबंध असेल येथवर, या विवाद्य बाबींचा परामर्श घेता येईल. परंतू, या नियमातील कोणतीही गोष्ट आवश्यक पक्षकारांच्या असंयोजनास लागू होणार नाहीत असे नमूद आहे.

१०. कायद्याची स्थापित स्थिती अशी आहे की, अपसंयोजन हे दाव्यास मारक नाही व त्यामुळे दावा अयशस्वी होत नाही. अपसंयोजनासंबंधीच्या हरकतींचा निकाल वादपत्रात काय म्हटले आहे त्यावरून केला पाहिजे, कैफियतीतील कथनांवरून नव्हे. योग्य असे पक्षकार दाव्यात सामील केले नाहीत ही गोष्ट दाव्यास मारक होत नाही. आवश्यक पक्षकार जर दाव्यात पक्षकार केलेले नसेल तर न्यायालयाने दावा सरळ सरळ न फेटाळता वादी यांना त्या आवश्यक पक्षकारास दाव्यात सामील करण्याची संधी दिली पाहिजे. पूर्ण व परिणामकारक अनुतोष दिला जावू शकत असेल तर त्यात इतरांना

पक्षकार म्हणून सामील करणेची आवश्यकता नाही. ति–हाईत इसम म्हणून सामनेवाला यांनी नि.क्र.१३ व ३८ ला अर्ज दाखल केले होते. सदरचे अर्ज तत्कालिन पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत. त्यानंतर मूळ अर्जामध्ये झालेल्या आदेशांप्रमाणे दुरूस्त्या होवून सामनेवाला क्र.१ म्हणून श्रीमती मालन निवृत्ती गुरव, सामनेवाला क्र.२ श्री. महादेव निवृत्ती गुरव व सामनेवाला क्र.३ म्हणून सचिन निवृत्ती गुरव यांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष मी मुद्दा हा टिकून राहत नाही म्हणून येणेप्रमाणे त्याचा निष्कर्ष मी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.१ व ३ करीता** :–

११. मुद्दा क्र.१ हा अर्जदार हे मयत सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत काय याबाबतचा आहे तर मुद्दा क्र.३ हा अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिहण्यास पात्र आहेत काय याबाबतचा आहे. सदरच्या दोन्ही मुद्यांच्या सिध्दतेचा बोजा अर्जदार यांचेवर टाकण्यात आलेला आहे. अर्जदार क्र.१ श्रीमती ज्योती सोमनाथ गुरव यांनी स्वत:चे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१८ व ३३ वर दाखल करून मूळ अर्जातील कथने जशीच्या तशी उद्घोषित केलेली आहेत. त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने त्या सोमनाथ निवृत्ती गुरव यांच्या पत्नी असून अर्जदार क्र.२ सिध्दांत व अर्जदार क्र.३ सोहम ही त्यांची मुले आहेत असे कथन केलेले आहे. त्याकरीता त्यांनी नि.क्र.२१ वर दाखल असलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्र नि.क्र.२२ वर दाखल असलेल्या जन्माचा दाखला तसेच, नि.क्र.३/२ वर दाखल असलेल्या जन्म दाखल्याचा आधार घेतलेला आहे. अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, सोमनाथ निवृत्ती गुरव हे दि.०९/०३/२०१५ रोजी मयत झालेले आहेत. त्याकरीता त्यांनी नि.क्र.२४ वर दाखल असलेल्या मृत्यूप्रमाणपत्राचा आधार घेतलेला आहे.

१२. अर्जदार यांचे असे शपथेवर पुढे कथन आहे की, कै. सोमनाथ यांनी त्यांचे हयातीमध्ये मृत्यूपत्र व्यवस्थापन केलेले नाही. अर्जदार हेच कै. सोमनाथ यांचे नावावर असलेल्या स्थावर व जंगम मिळकतीस हिंदू वारस कायद्यानुसार वर्ग १ मधील असल्यामुळे उत्तराधिकारी आहेत. त्यांचे सासरे निवृत्ती यांनी स्वकमाईतून श्री. लक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्था यांचेकडून भूखंड क्र.३१ खरेदी केला होता. सदर भूखंडावर

बांधकाम करणेसाठी त्यांनी बँकेचे अडीच लाख रूपये कर्ज घेतले. परंतू, बांधकामाची व कर्ज फेडीची त्यांनी ऐपत नसल्यामुळे व सोमनाथ हे कराड येथे स्थायिक होणार असल्यामुळे सदरचा भूखंड श्री. निवृत्ती यांनी सोमनाथ यांचे नावावर केला व बँकेच्या मंजूर कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी सोपवली. बँकेचे अभिलेखाला जरी निवृत्ती आत्माराम गुरव यांचे नाव असले तरी मयत सोमनाथ यांनी कर्जाची परतफेड केलेली आहे. कै. सोमनाथ यांनी संस्थेकडून भूखंड क्र.३१ चा कब्जा सन २००४ साली घेतला. त्याप्रमाणे सोसायटीने त्यांना सभासदत्व व १० भागप्रमाणपत्र सन २००५ साली अदा केली. सदर भूखंडाच्या मालक सदरी कै. सोमनाथ निवृत्ती गुरव व त्यांची स्वत:ची नोंद होणेकरीता त्यांनी ग्रामपंचायतीकडे अर्ज दिला. त्यानुसार ग्रामपंचायतीने सदर भूखंडास कै. सोमनाथ निवृत्ती गुरव व ज्योती सोमनाथ गुरव यांच्या नावांची नोंद केली. सदर बाब सिध्द करण्याकरीता अर्जदार यांनी भूखंड क्र.३१ चा सूची क्र.२ चा उतारा नि.क्र.२३, लक्ष्मी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे भाग क्र.१३१ ते १४० चे भाग प्रमाणपत्र नि.क्र.२५, मालमत्ता क्र.४६३ चा नमुना क्र.८ चा उतारा नि.क्र.२६ आणि निवृत्ती आत्माराम गुरव व सोमनाथ निवृत्ती गुरव यांच्या गृह कर्जाचा उतारा नि.क्र.६३ चा आधार घेतलेला आहे.

१३. अर्जदार यांचे असे शपथेवर पुढे कथन आहे की,कै. सोमनाथ निवृत्ती गुरव यांनी बँकेचे घेतलेले र.रू. अडीच लाखाचे कर्ज व स्वत:जवळील र.रू.दिड लाख गुंतवणूक करून सदर भूखंडावर एकूण र.रू. चार लाखांची इमारत बांधलेली आहे. सदरची इमारत ही त्यांचे ताब्यात आहे. सदर कर्जाचे हफ्ते मयत सोमनाथ यांनी नोकरीत असताना भरलेले आहेत व दि.०९/०३/२०१५ रोजी निधन झाल्यानंतर सदर कर्जाची र.रू.१९,०००/- थकबाकी आहे. त्याबाबत त्यांनी नि.क्र.६३ वर दाखल केलेल्या संयुक्त खाते उता-याचा आधार घेतलेला आहे. त्या स्त्री आहेत. त्यांना पतीचे निधनानंतर मिळकतीचा तपशील उपलब्ध झाला नव्हता. नुकतीच सदर माहिती मिळाल्यानंतर त्यांनी गृह निर्माण सोसायटीकड वारस नोंदीकरीता अर्ज दिला असता संस्थेने त्यांना तोंडी वारस दाखल्याची मागणी केली म्हणून प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

१४. अ.सा.क्र.१ ज्योती यांचे उलटतपासामधून त्यांचे सासरे हे लक्ष्मी गृह निर्माण सोसायटी बनवडी या संस्थेचे सभासद होते. सदर संस्थेने भूखंड क्र.३१ हा त्यांचे सासरे निवृत्ती गुरव यांना भाडेपट्याने दिला होता. निवृत्ती गुरव हे सन २००८ मध्ये मयत झाले. निवृत्ती गुरव यांना सोमनाथ, महादेव, सचिन ही मुले व पत्नी मालन हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी या सर्व वारसांना मूळ अर्जात पक्षकार म्हणून सामील केलेले नव्हते. भूखंड क्र.३१ वर बांधकाम करतेवेळी कर्ज काढण्याची वेळ आली. सदरचे कर्ज त्यांचे सास-यांच्या नावावर आहे. सदर भूखंडाचे सरसनिरस मानाने वाटप निवृत्ती यांचे तीन्ही मुलांमध्ये झालेले नाही. त्यांचे सासरे यांनी भूखंड क्र.३१ ला सोमनाथ यांचे नाव लावले आहे तेवढ्या गोष्टीचा विचार करून अर्जदार यांनी वारस दाखला मिळावा म्हणून अर्ज दाखल केलेला आहे, या सर्व बाबी त्यांनी मान्य व कबूल केलेल्या आहेत. तर अ.सा.क्र.१ ज्योती यांनी त्यांचे सासरे निवृत्ती यांनी भूखंड क्र.३१ वर बांधकाम सुरू केले, तात्पुरते कर्ज काढण्यासाठी सदरचा भूखंड सोमनाथ यांच्या नावावर केला, बँकेचे काढलेले कर्ज सर्वजण मिळून फेडत आहेत व भूखंड क्र.३१ हा सर्वांच्या मालकीचा आहे, या सर्व बाबी नाकारलेल्या आहेत.

१५. अ.सा.क्र.२ दिपक मारूती कोरडे यांच्या साक्षीमधून असे दिसून येते की, ते बँक ऑफ इंडीया कराड शाखा येथे अधिकारी आहेत. त्यांनी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे निवृत्ती आत्माराम गुरव व सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे एकत्रित गृह कर्ज खात्याचा खाते उतारा न्यायालयात दाखल करून त्यांचे साक्षीवरून त्यास नि.क्र.६३ देण्यात आलेली आहे. सदरचे साक्षीदाराचे उलटतपासामधून त्यांना न्यायालयात येवून साक्ष देण्याकरीता बँकेने अधिकारपत्र करून दिलेले नाही. दि.२८/०६/२०२३ रोजी कर्ज देतेवेळी बँकेने कोणती कागदपत्रे पाहिली, सदर कर्जाची परतफेड कोणी केली, या बाबी त्यांना सांगता आलेल्या नाहीत. त्यांचे साक्षीवरून असे दिसून येते की, सदर कर्जाची पूर्ण फेड झालेली आहे. कर्ज खाते बंद करण्यात आलेले आहे. बँकेचा सदनिकेशी कोणताही संबंध राहिलेला नाही.

१६. याउलट, सामनेवाला यांच्यातर्फे सामनेवाला क्र.२ श्री. महादेव निवृत्ती गुरव यांना सा.सा.क्र.१ म्हणून त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६७ वर दाखल

केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी प्रामुख्याने अर्जदार यांनी दाखल केलेला वारसाचा अर्ज बेकायदेशीर व चुकीचा आहे. सदरचा अर्ज हा खरी वस्तुस्थिती लपवून दाखल केलेला आहे. सामनेवाला यांनी त्यांचे कायदेशीर मालकी तसेच वारस हक्क व हिस्सा शाबितीसाठी नि.क्र.६६ चे कागदयादीने पुराव्याचे कागदपत्र दाखल केलेले आहेत. अर्जदार क्र.१ ते ३ हे कै. सोमनाथ यांचे कायदेशीर वारस असले तरी ते कै. निवृत्ती यांचे थेट वारस नाहीत. कै. सोमनाथ हे कधीही कै. निवृत्ती यांचे दावा मिळकतीस एकटेच वारस इतर वारसांना डावलून ठरूच शकत नाहीत. कारण दावा मिळकतीचे खरेदीपत्रास कै. निवृत्ती यांचे नाव असून कर्जही त्यांनीच काढलेले आहे व त्या कर्जाची फेड सर्व वारसांनी केलेली आहे. सामनेवाला क्र.२ व ३ यांना अर्जदार समजून त्यांनाही दावा मिळकतीचा वारस दाखला मिळणेचा हुकूम व्हावा अशी विनंती त्यांनी केलेली आहे.

१७. सा.सा.क्र.१ महादेव यांचे उलटतपासामधून असे समोर आले आहे की, निवृत्ती हे त्यांचे वडील, मालन ही त्यांची आई, सोमनाथ व सचिन हे त्यांचे भाऊ आहेत. निवृत्ती, मालन व सोमनाथ हे हयात नाहीत. अर्जदार क्र.१ ज्योती या सोमनाथ यांच्या पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ सिध्दांत व सोहम ही सोमनाथ यांची मुले आहेत. मौजे बनवडी ता. कराड येथे लक्ष्मी गृह निर्माण सोसायटी आहे. सदर सोसायटीमधील भूखंड क्र.३१ हा प्रथम निवृत्ती यांचे नावावर व त्यानंतर तो सोमनाथ यांचे नावावर आहे. सदर भूखंड घेतल्यानंतर सोमनाथ व निवृत्ती यांनी बॅंक ऑफ इंडीया या बॅंकेचे कर्ज काढून बंगला बांधला. सदर कर्जाची संपूर्ण फेड आता झालेली आहे. सदर कर्ज फेडल्याची एक पावती त्यांनी न्यायालयात दाखल केलेली आहे. वडीलांचे हयातीत अथवा निधन झाल्यानंतर भूखंड क्र.३१ ला त्यांच्या नावाची नोंद व्हावी याकरीता त्यांनी कोठेही अर्ज केलेला नाही. सोमनाथ यांचे निधनानंतर भूखंड क्र.३१ ला स्वत:च्या नावांची नोंद व्हावी याकरीता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे. परंतू, लक्ष्मी गृह निर्माण सोसायटी यांनी त्यांना वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सदर अर्ज केल्यानंतर अर्जदार यांनी दि.०२/०२/२०१६ च्या दैनिक लोकमतमध्ये सदर अर्जास कोणाची हरकत असल्यास न्यायालयात उपस्थित राहावे अशी हरकत उपस्थित केली होती. सदर नोटीस त्यांचे निदर्शनास आल्यानंतर त्यांनी त्वरीत न्यायालयात हजर होवून अर्जास हरकत नोंदवलेली आहे. अर्जदार हे प्रथमपासूनच बनवडी, ता. कराड येथे राहतात.

१८. त्यानंतर सामनेवाला यांच्यातर्फे सा.सा.क्र.२ महादेव आप्पाजी गुरव यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.६८ वर दाखल करण्यात आलेले आहे. त्यांचे साक्षीमधून असे दिसून येते की, ते अर्जदार व सामनेवाला यांना ओळखतात. ते लक्ष्मी गृह निर्माण सोसायटीचे माजी चेअरमन व सध्या सभासद आहेत. सदर सोसायटीमधील भूखंड क्र.३१ हा कै. निवृत्ती यांना ९९ वर्षाचे करारावर देण्यात आला होता. निवृत्ती हे दि.०४/०६/२००८ रोजी मयत झाले. त्यानंतर सदर भूखंडाला वारस म्हणून मालन, सोमनाथ, महादेव, सचिन यांची नोंद झालेली आहे. कै. निवृत्ती यांनी सदर भूखंडावर बांधकाम करण्यासाठी सन २००४ मध्ये बँक ऑफ इंडीया कराड शाखेचे अडीच लाख रूपयांचे कर्ज काढले होते व स्वत:जवळ असलेले दिड लाख असे चार लाख रूपये खर्च करून त्यांनी सदर भूखंडावर बांधकाम केले. कै. निवृत्ती यांनी त्यांचे हयातीत सदर कर्जाची परतफेड केली. कै. निवृत्ती यांचे निधनानंतर उर्वरीत कर्जाची व्याजासह परतफेड त्यांचे सर्व वारसांनी केली. सदर वारसांपैकी मालनबाई व सोमनाथ हे मयत आहेत. सदर मिळकतीस सर्व वारसांना समान कायदेशीर वारसा हक्क येतो.

१९. सा.सा.क्र.२ महादेव आप्पाजी गुरव यांचे उलटतपासामधून त्यांना साक्षीसाठी न्यायालयाने साक्षीसमन्स पाठवलेले नव्हते. सामनेवाला यांनी सांगितलेप्रमाणे साक्ष देण्यासाठी ते न्यायालयात आले. ते लक्ष्मी गृह निर्माण सोसायटीचे माजी चेअरमन होते याबाबत त्यांनी कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केलेला नाही. भूखंड क्र.३१ हा कै. निवृत्ती आत्माराम गुरव यांना देण्यात आला होता हे दर्शविणारा पुरावा त्यांनी न्यायालयात दाखल केलेला नाही. नि.क्र.२३ वर दाखल असलेल्या सूची क्र.२ च्या उता–यावर लिहून देणार म्हणून सोमनाथ निवृत्ती लिहून देणार म्हणून गृह निर्माण सोसायटी अशी नावे लिहिलेली आहेत. कै. निवृत्ती यांचे निधनानंतर भूखंड क्र.३१ ला वारस म्हणून मालन, सोमनाथ, निवृत्ती व सचिन यांचे नावांची नोंद झाली हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा त्यांनी न्यायालयात दाखल केलेला नाही. बँक ऑफ इंडीया शाखा कराड चे कर्ज कोणी काढले याबाबतची त्यांना वैयक्तीक माहिती नाही याबाबी समोर आलेल्या आहेत.

२०. वर सविस्ताराने नमूद केलेल्या तोंडी पुराव्यावरून असे दिसून आले आहे

की, निवृत्ती आत्माराम गुरव हे मूळ पुरूष आहेत. त्यांना सोमनाथ, महादेव व सचिन ही तीन मुले आहेत. मालन ही त्यांची पत्नी आहे. वर नमूद व्यक्तींपैकी सोमनाथ निवृत्ती गुरव व मालन निवृत्ती गुरव हे हयात नाहीत. ज्योती सोमनाथ गुरव या सोमनाथ गुरव यांच्या पत्नी असून सिध्दांत व सोहम ही सोमनाथ गुरव यांची मुले आहेत. सोमनाथ यांचे केवळ अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत यास नि.क्र.२१ वर दाखल असलेले विवाह नोंदणी प्रमाणपत्र, नि.क्र.२२ व ३/२ दाखल असलेले जन्माचे दाखले हा लेखी पुरावा अर्जदार यांचे तोंडी कथनांना पुष्टी व दुजोरा देतो. महादेव व सचिन हे कै. सोमनाथ गुरव यांचे भाऊ आहेत. नि.क्र.२३ वर दाखल असलेल्या सूची क्र.२ चे उता-यावर सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे नावे लक्ष्मी गृह निर्माण संस्था मधील भूखंड क्र.३१ असल्याचे दिसून येते. नि.क्र.२५ वर दाखल असलेले भाग क्र.१३१ ते १४० चे भागप्रमाणपत्र यावर देखील सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे नाव नमूद असल्याचे दिसून येते. नि.क्र.२६ वर दाखल असलेला नमुना क्र.८ चा उतारा पाहिला असता बनवडी येथील मालमत्ता क्र.४६३ भूखंड क्र.३३ला मालक सदरी सोमनाथ निवृत्ती गुरव व ज्योती सोमनाथ गुरव यांची नावे नमूद असल्याचे दिसून येते. नि.क्र.६६ च्या वर्णन यादीसमवेत जी कागदपत्र सामनेवाला यांनी दाखल केली आहेत ती त्यांनी यथायोग्यरितीने कायदेशीर तरतूदीप्रमाणे सिध्द करून घेतलेली नाहीत. केवळ कर्जाच्या काही पावत्या सामनेवाला यांनी न्यायालयात दाखल केल्या एवढ्या कारणावरून कर्जाची परतफेड ही निवृत्ती यांचे सर्व वारसांनी केली व सोमनाथ यांचे सामनेवाला हे देखील कायदेशीर वारस आहेत असे समजणे संयुक्तीक ठरत नाही.

२१. येथे हे प्रामुख्याने नमूद करणे आवश्यक आहे की, अर्जदार क्र.१ यांनी मूळ अर्ज त्यांचे पतीचे निधनानंतर त्या मयत सोमनाथ निवृत्ती गुरव यांच्या अर्जदार क्र.२ व ३ सह कायदेशीर वारस आहेत असा वारस दाखला मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. तर सामनेवाला यांनी ज्या काही हरकती उपस्थित केलेल्या आहेत त्यावरून असे दिसून येते की, भूखंड क्र.३१ चे सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही म्हणून त्यांनाही वाटा मिळावा अशी मागणी ते करत असल्याचे दिसून येते.

२२. अशा परिस्थितीमध्ये **हिंदू वारस कायदा, १९५६** मध्ये नमूद करण्यात

आलेले **कलम ८** मधील तरतूद व सदर कलमाचे अनुसारची अनुसूची पाहणे संयुक्तीक व न्यायोचित ठरते. **कलम ८** मध्ये मृत्यूपत्र न करता मरण पावणा–या हिंदू पुरूषांची संपत्ती या प्रकरणाच्या उपबंधानुसार प्रक्रांत होईल. (क) पहिल्यांदा, जे वारसदार अनुसूचीच्या पहिल्या वर्गामध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे नातलग असतील त्यांच्याकडे, (ख) दुस–यांदा, जर पहिल्या वर्गामधील कोणतेही वारसदार नसेल तर, जे वारसदार अनुसूचीच्या दुस–या वर्गामध्ये विर्निदिष्ट केल्याप्रमाणे नातलग असतील त्यांच्याकडे, (ग) तिस–यांदा, जर दोहोपैकी कोणत्याही वर्गाचा कोणताही वारसदार नसेल तर, मृताच्या गोत्रजांकडे, आणि (घ) शेवटी, जर मृताचा कोणताही गोत्रज नसेल तर, त्याच्या भिन्न गोत्रजांकडे.

सदर अनुसूचीमध्ये **वर्ग १** ला पुत्र, कन्या, विधवा, माता, पूर्वमृत पुत्राचा पुत्र, पूर्वमृत पुत्राची कन्या, पूर्वमृत कन्येचा पुत्र, पूर्वमृत कन्येची कन्या, पूर्वमृत पुत्राची विधवा, पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राचा पुत्र, पूर्वमृत पुत्राची कन्या, पूर्वमृत पुत्राच्या पूर्वमृत पुत्राची विधवा यांचा वारसदार म्हणून समावेश आहे.

**वर्ग २** ला १) पिता २) पुत्राच्या कन्येचा पुत्र, पुत्राच्या कन्येची कन्या, भाऊ, बहिण ३) कन्येच्या पुत्राचा पुत्र, कन्येच्या पुत्राची कन्या, कन्येच्या कन्येचा पुत्र, कन्येच्या कन्येची कन्या ४) भावाचा पुत्र, बहिणीचा पुत्र, भावाची कन्या, बहिणीची कन्या ५) पित्याचा पिता, पित्याची माता ६) पित्याची विधवा, भावाची विधवा ७) पित्याचा भाऊ, पित्याची बहिण ८) मातेचा पिता, मातेची माता ९) मातेचा भाऊ, मातेची बहिण. हिंदू वारसदार वर्ग १ मधील सर्व वारसांना समान वारसा हक्क मिळतो.

२३. सदर अर्ज दाखल झाल्यानंतर न्यायालयाचे आदेशाने दि.०१ व ०२/१२/२०१५ च्या 'दैनिक लोकमत' या वर्तमानपत्रात जाहिर नोटीस तसेच दि.२७/१२/२०१५ रोजी मौजे बनवडी, ता. कराड, जि. सातारा येथील चावडीच्या ठिकाणी व इतर ठिकाणी जाहिरनामा प्रसिध्द केला व त्यांच्या अर्जावर आक्षेप असल्यास न्यायालयात हजर राहावे असे निर्देशित केले. त्यानंतर सामनेवाला यांचेखेरीज इतर कोणीही न्यायालयात उपस्थित होवून सदर अर्ज मंजूर करण्यास हरकत उपस्थित केलेली नाही.

२४. हिंदू वारस कायदा, १९५६ मधील कलम ८ मधील तरतूदी व सदर

कलमाचे अनुसारची अनुसूची यांचा विचार करता श्री. महादेव निवृत्ती गुरव व श्री. सचिन निवृत्ती गुरव हे कै. सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे वर्ग २ चे उत्तराधिकारी ठरतात. कलम ८ मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतूदीचा विचार करता हिंदू पुरूषांची संपत्ती या प्रकरणाच्या उपबंधानुसार प्रक्रांत होईल असे नमूद आहे. कै. सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे मृत्यूसमयी अर्जदार क्र.१ ते ३ व मयत मालन केवळ हेच त्यांचे वर्ग क्र.१ चे वारस असल्याने दिसून येतात. परंतू, त्यापैकी सामनेवाला क्र.१ मालन या हयात नाहीत त्यामुळे कै. सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे निधनानंतर अर्जदार क्र.१ ते ३ हेच एकमेव कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ हे कै. सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे वारस असल्याचे 'वारस प्रमाणपत्र' मिळण्यास पात्र ठरतात म्हणून मी मुद्दा क्र.१ व ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र.४ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

:: **आदेश** ::

१. अर्जदारांचा वारसा प्रमाणपत्र बाबतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ३ यांना ते कै. सोमनाथ निवृत्ती गुरव यांचे वर्ग १ चे वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्र (हेयरशीप सर्टिफिकेट) अदा करण्यात यावे.

३. प्रकरणाची कार्यवाही बंद करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषित केला.)

SUDHIR BALASAHEB TODKAR
Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2026.03.18 15:58:27 +0530

कराड. (सु. बा. तोडकर)

दि. १८/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश व. स्तर, कराड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D.F. file are same word for word as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | V. C. Nakate. |
| Court name | : | Civil Judge Sr. Division, Karad. |
| Date | | 18/03/2026 |
| Signed by P O on | | 18/03/2026 |
| Uploaded on | : | 18/03/2026 |